# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/01/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### दुखापत

**३) पो.स्टे. भिवापूर** :– अंतर्गत ३४ कि.मी. अंतरावरील मौजा वणी येथे दिनांक २२/०१/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मुकेश बंडुजी रंधई, वय २५ वर्ष, रा. वणी ता. भिवापूर हा आपल्या मिस्त्रीच्या कामावरून घरी आला असता गावातील चौकात बोरींग जवळ त्याचा मित्र नामे– निखील बारेकर याचे सोबत बोलत बसला होता त्या ठिकाणी आरोपी क्र. १) विधीसंघर्ष बालक हा मोटरसायकलने आला व त्याने फिर्यादीला विनाकारण शिवीगाळ केली त्यास फिर्यादीने ''तु कोणाला शिवीगाळ केली'' असे हटकले असता त्याने ''तुला शिवीगाळ केली'' असे म्हटले असता तेव्हा फिर्यादीने त्याला एक थापड मारली व पुन्हा शिवीगाळ करायची नाही असे म्हटले व फिर्यादी आपले घरी निघुन गेले. आरोपी विधीसंघर्ष बालक व त्याचे सोबत आरोपी क्र. २) संदेश उर्फ अखिल उर्फ टायसन प्रकाश आंबुलकर वय २३ वर्ष रा. लोणारा हे दोघेही फिर्यादीचे घरा समोर आले व शिवीगाळ करत होते तेव्हा फिर्यादी घराचे बाहेर निघाले असता आरोपी अखिल उर्फ टायसन आंबुलकर याने आपल्या हातातील तलवार फिर्यादीला मारण्यास उगारली असता फिर्यादीने लोखंडी तलवार आपल्या डाव्या हाताने अडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा फिर्यादीच्या डाव्या हाताला अंगठया जवळ बोटाला जखम झाली व फिर्यादी हे ओरडले असता गावातील लोक धावुन आले लोखंडी तलवार सोडून आरोपी अखिल उर्फ टायसन आंबुलकर व विधीसंघर्ष बालक हे फिर्यादीला ''तु बाहेर भेट तुला जिवाने मारून टाकतो'' अशी धमकी देवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४, भादंवि. सहकलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. विधीसंघर्ष बालक यास सुचनापत्र हजर बाबत त्याचे वडीलांना दिले. आरोपी क्र. २) याला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चंगोले पो.स्टे. भिवापुर मो. नं. ९८२३३८०८१५ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक २२/०१/२०२३ चे ०७.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्यीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष, ०५ महिने हिला विधीसंघर्ष बालक हा फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन घेवुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे विधीसंघर्ष बालक याच्याविरूद्ध कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जवाहर चव्हाण पो.स्टे काटोल मो. नं. ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**